| CNR NO.-MHWS100015322020 | खटला दाखल तारीख – ११/१०/२०२२ |
|---|---|
| | खटला नोंदणी तारीख – ११/१०/२०२२ |
| | खटला निकाल तारीख – १८/०५/२०२३ |
| | **कालावधीः ००वर्ष ०७महिने ०७दिवस** |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मालेगांव, जिल्हा – वाशिम

(पिठासीन अधिकारी– जी. एस. बडगुजर)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रः ७८१/२०२२** **निशाणी क्रमांकः ०८**

महाराष्ट्र शासन तर्फे, )
ठाणे अंमलदार, मालेगांव पोलीस स्टेशन, )
ता. मालेगांव, जि. वाशिम. ) **.... अभियोग पक्ष**

**विरुध्द**

कैलास प्रल्हाद निगोते, )
वय– ४० वर्ष, व्यवसाय– मजुरी, )
रा. मारसुळ, ता. मालेगांव, जि. वाशिम. ) **.... आरोपी**

.................................................................................................................

**दोषारोप – महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे.**

.................................................................................................................

श्री. बी.एल.इंगळे – अभियोग पक्षातर्फे विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता
श्री. व्ही.आर.लाहोटी – आरोपीतर्फे जेष्ठ विधीज्ञ

.................................................................................................................

## न्या य नि र्ण य

(घोषित तारीखः १८ मे, २०२३)

१. प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, कलम ६५ (ई) प्रमाणे दोषारोप ठेवुन चालविण्यात आला.

२. शासना तर्फे पो.हे.कॉ.,श्री.अनिल कांबळे, पोस्टे मालेगांव यांनी फिर्याद दिली की, दिनांक ०२/०९/२०२२ रोजी ते पोस्टे मालेगांव येथे कार्यरत असतांना माहिती मिळाली की, कैलास प्रल्हाद निघोते (आरोपी) हे ग्राम मारसुळ, ता. मालेगांव, जि. वाशिम येथे गावठी हातभट्टीची दारु अवैध रित्या चोरटी विक्री करत आहे. त्याप्रमाणे ते स्टाफ व पंचासह घटनास्थळी गेले असता त्यांना आरोपीच्या ताब्यात १४ लिटर गावठी हातभट्टीची दारु ज्याची किंमत रुपये १४८०/– चा मुद्देमाल मिळुन आला. त्यापैकी १८० एम.एल. गावठी देशी दारु एका चापट काचेच्या शिशीत रासायनिक विश्लेशनासाठी राखुन ठेवला. फिर्यादीने पंचासमक्ष सदर मुद्देमाल जप्त केला. तद्नंतर आरोपीविरुध्द खबर दिली. तद्नंतर तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

३. फिर्यादीच्या खबर अनुषंगाने गुन्हा क्रमांक ३५३/2022 नोंदविला गेला व तपासअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले गेले. आरोपीविरुध्द आरोप (नि.क्र.६) निश्चित केले असता त्याने त्याचा इन्कार केला म्हणून पुढील संपरिक्षा पुर्ण करण्यात आली. आरोपीविरुध्द गुन्हा दर्शक पुरावा मिळुन न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन नोंदविण्यापासुन सुट देण्यात आली.

४. सरकारी पक्षाच्या आरोपांवरुन खालील मुद्दे निष्पन्न होतात. या मुद्दयांचा निष्कर्ष मी समोर दिला असून त्याची कारणमिमांसा खाली केली आहे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष शाबित करतो काय कि, दिनांक ०२/०९/२०२२ रोजी ११:०० वाजताच्या सुमारास ग्राम मारसुळ, ता. मालेगांव जि. वाशिम येथे आरोपीच्या ताब्यात १४ लिटर गावठी हातभट्टीची दारु ज्याची किंमत रुपये १४८०/– चा मुद्देमाल विना पास व परवाना ताब्यात बाळगतांना आढळुन आला व त्यायोगे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, कलम ६५ (ई) अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला ? | ...नाही. |
| २. | आदेश काय ? | ...अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रं. १ करीता :–**

५. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द संशयाच्या पलीकडे जावून गुन्हा सिध्द करणे आवश्यक आहे व तसा पुरावा न दिल्यास आरोपी हा संशयाच्या फायदा घेवुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे हे फौजदारी खटल्यातील ठरलेले तत्व आहे. प्रस्तुत खटल्यात – आरोपी त्याच्या ताब्यात विना पास व परवाना १४ लिटर गावठी हातभट्टीची दारु ज्याची किंमत रुपये १४८०/– असा मुद्देमाल बाळगतांना मिळुन आल्याचे तथ्य वाजवी संशयापलीकडे जावून निर्विवादपणे सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाचे खांद्यावर आहे. त्या अनुषंगाने अभिलेखावरुन पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

६. सदर खटल्यात अभियोग पक्षाच्या वतीने एका साक्षीदारास तपासण्यात आले, त्यात (सा.क्र.१) — राहुल भिमराव भारसाकळे (नि.क्र.०७) यांची घटनास्थळ तथा जप्ती पंच म्हणुन साक्ष नोंदविण्यात आली.

७. पंच (सा.क्र.१) यांनी त्यांचे समक्ष पंचनामा झाल्याचे नाकारुन केवळ पंचनाम्यावरील सही केल्याचे कबुल केले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या खटल्याला समर्थन केले नसल्याने विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्याचा कसुन उलटतपास घेतला. मात्र अभियोग पक्षाला सहाय्यभुत होईल असा सबळ पुरावा पटलावर आला नाही. सबब पंच साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षाला उपयुक्त ठरत नाही.

८. प्रस्तुत प्रकारच्या खटल्यांमध्ये जप्ती पंचनाम्यास अनन्य साधारण महत्व असते. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिले असता अभियोगपक्षाने रासायनिक पृथःकरणाचा अहवाल दाखल आहे. मात्र पंच साक्षीदार फितुर झाल्याने जप्ती पंचनामा निर्विवादपणे सिध्द झालेला नाही. तसेच, अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवूनही फिर्यादी, तपासी अमंलदार आणि इतर महत्वाचे साक्षीदारांची साक्ष अभियोगपक्षाने नोंदविली नाही. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे जप्ती पंचनामा हा साक्षीदारांच्या पुराव्यातुन शाबित केलेला नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आला आणि आरोपी हा दारु परवाना नसतांना चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगुन मिळुन आल्याचे तथ्य अभियोग पक्षाने वाजवी संशयापलिकडे जावुन निर्विवादपणे शाबीत केलेले नाही.

९. एकंदरीत पटलावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता मी आरोपीस सदरील प्रकरणातून योग्य त्या पुराव्याअभावी संशयाच्या बळावर दोषमुक्त होण्यास पात्र समजतो व त्या अनुषंगाने खालील आदेश पारित करतो.

**आ दे श**

१. आरोपी – कैलास प्रल्हाद निगोते यांना मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) या अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमालाची अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

४. अभियोग पक्षाने प्रस्तुत निकालाविरुध्द, मा. वरिष्ठ न्यायालयात दाद मागितल्यास, आरोपी हे नोटीस मिळताच स्वतःहून हजर राहतील याचे खात्रीसाठी, आरोपीने आजपासून सहा महिनेचे कालावधी करिता, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७– अ (१) अन्वये पुर्तता करावी.

(न्यायानिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GAJANAN SHIVDAS BADGUJAR
Date: 2023.05.18 17:24:27 +0530

(जी.एस.बडगुजर)
दिनांकः– १८/०५/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मालेगांव.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file Judgment is same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Shivam B. Patange (L.G.) |
| Name of Court | :- | CJJD & JMFC, Malegaon |
| Date of Dictation | :- | 18.05.2023 |
| Judgment signed by the PO on | :- | 18.05.2023 |
| Judgment uploaded on | :- | 18.05.2023 |